IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# संस्कृत साहित्य आणि आधुनिक स्त्रीवाद : साम्य व विरोधाभास

**प्रा. पायल रामचंद्र शेळके**
छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा.
घटक महाविद्यालय : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*स्त्री, स्त्रीवाद,सक्षमीकरण*

**ABSTRACT**

समाजाच्या उत्कर्षाच्या वाटचालीमध्ये अन्य विविध घटकांपैकी स्त्री पुरुष हे घटक समाजाच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा घटक मानला जातो. त्यामुळे या विकासाचे मूल्यमापन करीत असताना स्त्रीवाद सक्षमीकरण ही गोष्ट अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. काही ठिकाणी स्त्रियांच्या विविध समस्यांचा उहापोह केला जातो तर काही ठिकाणी स्त्री ही निर्भीड निर्णय क्षम स्वायत्त असलेली सुद्धा दिसून येते. पण संस्कृत साहित्यातील स्त्री ही कर्तव्यांच्या पुढील दबलेली नैतिक मूल्यांमुळे निर्भिड नसलेली दिसून येते.याविषयी जाणून घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची मांडणी करणार आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shelke, P. R. (2025). संस्कृत साहित्य आणि आधुनिक स्त्रीवाद : साम्य व विरोधाभास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2589–2591.

**संशोधन पद्धती-**

शोधनिबंधाचे विचार मंथन प्रस्तुत करीत असताना वर्णनात्मक आणि तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**प्रस्तावना** -

संस्कृत साहित्य हे प्राचीन भारतीय संस्कृतीचे द्योतक आहे, तर आधुनिक स्त्रीवाद हा समकालीन सामाजिक-राजकीय चळवळीचा भाग आहे. दोन्हींचा केंद्रबिंदू स्त्री असला तरी दृष्टीकोन, उद्दिष्टे व पद्धती वेगवेगळ्या आहेत. संस्कृत साहित्य हे प्राचीन भारतीय संस्कृतीचे, तत्त्वज्ञानाचे व सामाजिक जीवनाचे सशक्त प्रतिबिंब आहे. वेद, उपनिषदे, स्मृती, महाकाव्ये व नाटके यांमधून तत्कालीन समाज रचना स्पष्ट होते. आधुनिक काळात उदयास आलेला स्त्रीवाद हा स्त्रीच्या सामाजिक, आर्थिक व वैचारिक समानतेसाठीचा विचार प्रवाह आहे. संस्कृत साहित्य आणि आधुनिक स्त्रीवाद या दोन्हींचा केंद्र बिंदू स्त्री असला तरी त्यांच्या मांडणीमध्ये साम्य तसेच विरोधाभास आढळतात.

**विषय विवेचन** –

आधुनिक विचारवंत असा विश्वास करतात की एखाद्या विशिष्ट युगातील महिलांची सामाजिक राजकीय आणि आर्थिक स्थिती ही त्या युगातील समृद्धी आणि प्रगतीचे वर्णन दर्शविते. रामायणाचा काळ हा भारतीय संस्कृतीचे वर्णन करणारा काळ मानला जातो.

**आदिकाव्यरामायण** –

संस्कृत साहित्यातील रामायण हे 'आदिकाव्य' म्हणून ओळखले जाते. एकूण सात काण्ड आणि चोवीस हजार श्लोक असलेल्या या काव्याची रचना वाल्मिकी ऋषींनी केलेली दिसून येते. रामायणातील कथानक हे रामाच्या जीवन कथेवर आधारित आहेत. यामध्ये रामाची पत्नी सीता ही पतीव्रता धर्माचे पालन करणारी, वनवासात पतीसह कष्ट सहन करणारी व आपल्या नैतिक मूल्यांशी प्रामाणिकपणा, त्याचबरोबर ठराविक काळानंतर अग्निपरीक्षा देताना सीतेचा विरोध न करणे व त्यामुळे अन्यायास बळी जाणे. आणि तिच्यावर झालेला अन्याय, त्याचबरोबर कैकयीची महत्त्वकांक्षा, शबरीची रामाबद्दलची भक्ती, उरमिलेचा त्याग अशाप्रकारे स्त्रियांचे वर्णन रामायणामध्ये चित्रीत झालेले दिसून आले आहे.यावरूनच असे लक्षात येते की स्त्री ही एक संयमी, सहनशील, प्रेमळ, दयाळू, महत्त्वकांक्षी अशी आहे.

पण याउलट आजची स्त्री ही अन्याला विरोध करणारी व त्यावरती लढा देणारी, जाब विचारणारी, सक्षम,निर्भीड, कणखर स्वरक्षणाबरोबरच आपल्या भारत देशाचे देखील रक्षण करणारी दिसून येते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे एप्रिल २०२५ मध्ये पहेलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी तसेच अनेक दहशतवादी तळ उध्वस्त करण्यासाठी मे २०२५ मध्ये ऑपरेशन सिंदूर या मिशनचे नियोजन केले. यामध्ये कर्नल सोफिया कुरेशी (भारतीय सैन्य) आणि विंग कमांडर व्योमिका सिंग (भारतीय हवाई दल) या दोन प्रमुख महिला अधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली त्यांनी पत्रकार परिषदेत सर्व घडामोडींची माहिती दिली.

यामधून भारत देशामध्ये नारीशक्तीचे, महिला सक्षमीकरण त्याचबरोबर 'हिंदू मुस्लिम ऐक्याचे' प्रतिनिधित्व करण्यात आलेले दिसून येते. कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय सैन्यातील वरिष्ठ अधिकारी, यांनी संयुक्त राष्ट्राच्या शांतता या मोहिमेमध्ये देखील नेतृत्व केले आहे. तर विंग कमांडर व्योमिका सिंग या भारतीय

हवाई दलातील हेलिकॉप्टर पायलट, ज्यांनी मोहिमेची माहिती देताना देशाला एक शक्तिशाली संदेश दिला की, भारत देशामधील एक स्त्री ही प्रत्येक आघाडीवर नेतृत्व करू शकतात.

एकंदरीत पाहायला गेले तर तू थकला असशील तर माझी देहवात पेटवून ठेव असा स्त्रीचा अंतः स्वभाव आहे. पण आधुनिक काळातील स्त्री ही निर्णयक्षम निर्भिड अशा प्रकारची असलेली दिसून येते.

**समन्वयाची गरज :**

संस्कृत साहित्यातील स्त्रीचा सन्मान,नैतिक मूल्ये व बौद्धिक गौरव हे आधुनिक स्त्रीवादातील समानता, स्वातंत्र्य व अधिकार या तत्त्वांशी जोडल्यास संतुलित समाज निर्मिती शक्य आहे. दोन्ही विचार प्रवाह परस्पर विरोधी नसून परस्पर पूरक ठरू शकतात.

**निष्कर्ष :**

संस्कृत साहित्य आणि आधुनिक स्त्रीवाद यांच्यात साम्यही आहे आणि विरोधाभासही आहे. संस्कृत साहित्य स्त्रीला आदर्शाच्या चौकटीत गौरविते, तर आधुनिक स्त्रीवाद स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व देतो. दोन्हींचा समन्वय केल्यास स्त्रीच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग खुला होतो. त्यामुळे आधुनिक काळात संस्कृत साहित्याचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) पांडे सुरुची, ‘संस्कृत साहित्याचा इतिहास रामायण महाभारत आणि पुराणे’, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे. २००१

२) हिराचंद लालचंद ,‘वाल्मीकि रामायण’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. १९८७

३) लघुसिद्धान्तकौमुदी आणि वैदिक वाङ्मयाचा इतिहास, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१०